मला भावलेले काव्य यासाठी मी माझ्या एका मैत्रिणीची - संध्या रानडे हिची कविता निवडली आहे.

सावली - संध्या रानडे

माझी अन सावलीची ओळख खूप लहानपणापासूनची ,
खूप जुनी, तरी ही दरवेळी नव्यानेच तिच्याकडे पाहायला लावणारी,
कधी लांब पसरलेल्या रस्त्यावर पसरत जाणारी
तर कधी,
आपल्याच पायाशी घोटाळणारी, शोध घ्यायला लावणारी.
ओळख वाढत गेली
अन एके दिवशी, गाढ मैत्रीच्या क्षितिजावर त्या काळ्या आकृतीने, मला माझ्या 'सूर्याची' ओळख करून दिली.

ही कविता निवडण्याचे कारण म्हणजे ह्यातली शेवटची ओळ आणि 'माझ्या सूर्याची' हे शब्द.
सावलीला आपण कधीच फारसे महत्त्व देत नाही. लहानपणापासून आपल्याला तिची ओळख असते. प्राणी सुद्धा आपल्याच सावलीशी खेळताना आपण पाहतो.
सावल्यांचा खेळ आपण पाहतो. गणितात एका इमारतीच्या सावलीच्या लांबीवरून दुसऱ्या इमारतीची लांबी काढतो. अशी तिची ओळख वाढत जाते.
पण ह्या सर्व प्रवासात महत्त्व सूर्यालाच राहते.
आपल्या पुराणात छाया किंवा सावली ही सूर्याची पत्नी मानली आहे. तरीही ती काही फार लक्ष देण्यासारखी आहे असे आपल्याला वाटत नाही.
हे सगळे विचार मनात येत असतानाच शेवटचे वाक्य आपला सावलीकडे बघण्याचा दृष्टिकोन पूर्णपणे बदलून टाकते.
पहिला शब्द म्हणजे 'त्या काळ्या आकृतीने'.
काळ्या रंगाला जगभरातच खूप वाईट वागणूक मिळत आली आहे. त्यामुळे तिचे क्षुद्रत्व अधोरेखित होते.
'मला माझ्या सूर्याची ओळख करून दिली'
ह्या वाक्याने मात्र तीच क्षुद्र सावली आपल्यासाठी किती महत्त्वाची आहे हे आपल्याला पटते.
पृथ्वीला एक सूर्य आहे आणि त्यामुळे पृथ्वीवर जीवन आहे. तसाच प्रत्येकाच्या जीवनाला अर्थ देणारा एक सूर्य असला पाहिजे. तो नसेल तर सावली पडणारच नाही.
आपण लहानपणी संस्कृत सुभाषितात शिकलो की वृक्ष हे सत्पुरुषांप्रमाणे आहेत. ते स्वतः उन्हात उभे

राहून दुसऱ्याला सावली देतात. आपली सावली निर्माण होण्यासाठी आपल्याला उन्हात उभे राहावे लागते. हाही अर्थ ह्या ओळीतून निघू शकतो.
ज्ञानेश्वरांनी सज्जनांना मार्तंड जे तापहीन म्हटले, पण खरंच जर सूर्याचा ताप कमी झाला तर हे जग चालणारच नाही. तेव्हा हा ताप स्वतः सहन करून दुसऱ्यांना सावली देणारे वृक्ष किंवा ढग होणे केव्हाही जास्त चांगले असे मला वाटते.
सूर्याशी ओळख करून दिली यातून आत्म्याची परमात्म्याशी ओळख करून दिली हाही अर्थ निघू शकतो.
सुनीत किंवा sonnet ह्या प्रकारच्या काव्यात जसा शेवटी turn असतो तसेच मला ह्या कवितेत वाटले. शेवटच्या वाक्याने कविता खूपच उंचीवर जाते आणि पहिल्या ओळींनाही जास्त अर्थ प्राप्त होतो कारण एवढ्या महत्वाच्या सावलीची आपण अतिपरिचयातून अवज्ञाच करतो हे आपल्याला समजते.
असे म्हणतात की आत्मशोध घेण्यासाठी अथक प्रयत्न करणाऱ्या योग्यांनाही त्याचे ज्ञान होत नाही पण काहींना तो सहजपणे भेटतो.
जिची आपण काळी म्हणून आणि रोजच्या भेटीतील म्हणून उपेक्षा करतो तीच सावली खरे तर आपल्याला जीवनाचे तत्त्वज्ञान सांगत असते.
'गाढ मैत्रीच्या क्षितिजावर'
यातून मला आणखी एक गोष्ट आठवली
गीतेमध्ये जेव्हा श्रीकृष्ण अर्जुनाला विश्वरूप दाखवतात तेव्हा अवाक होऊन तो म्हणतो की मी तुझे महत्त्व ना ओळखून तुला मित्रा किंवा हे यादवा अशी हाक मारत होतो. अजाणतेपणी आणि प्रेमामुळे झालेल्या अपराधाबद्दल मला क्षमा कर. तसंच काहीसे ही कविता वाचल्यावर सावलीला म्हणावेसे वाटते.
आणि सर्वात शेवटी ही कविता अगदी तरुणपणी म्हणजे junior कॉलेज मध्ये असताना लिहिणाऱ्या माझ्या मैत्रिणीचे संध्या रानडे हिचे कौतुक करावे तेवढे थोडंच असे मला वाटते.

- डॉ. मंजिरी मणेरीकर